आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

५ जुलै २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- बिहार, आंध्र प्रदेशाप्रमाणे महाराष्ट्रालाही विशेष दर्जा किंवा विशेष पॅकेज मिळावं यासाठी प्रयत्न करण्याची अर्थमंत्री अजित पवार यांची विधानसभेत ग्वाही

- टी २० विश्वचषकविजेत्या भारतीय संघातल्या मुंबईकर क्रिकेटपटूंचा विधान भवनात  सत्कार / भारतीय संघाला राज्य सरकारकडून ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर

- स्पर्धा परीक्षेत गैरव्यवहार रोखण्यासाठीचं महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध विधेयक विधानसभेत सादर

- वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठीच्या नीट - पी जी प्रवेश परीक्षेचं सुधारित वेळापत्रक जाहीर

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-२० मालिकेतला पहिला सामना आज चेन्नईत / भारताचा नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय

**<><><><><>**

बिहार आणि आंध्र प्रदेश प्रमाणे महाराष्ट्रालाही विशेष दर्जा किंवा विशेष पॅकेज मिळावं यासाठी प्रयत्न करणार असल्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत केली. अर्थसंकल्पावरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. भविष्यात उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करावेच लागतील असं ते म्हणाले. राजकोषीय

तुटीविषयी अर्थसंकल्पावरच्या चर्चेत विविध सदस्यांनी चिंता व्यक्त केली होती. त्यावर राज्यात ही तूट केंद्र सरकारने घालून दिलेल्या ३ टक्क्याच्या मर्यादेत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. २०२८ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरची करण्याचं उद्दिष्ट आहे. त्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरू आहे, अशी माहिती पवार यांनी दिली.

राज्यातल्या विविध शहरात मेट्रोचं काम पूर्ण झाल्यावर दळणवळण व्यवस्थेत सुधारणा होईल. परकीय गुंतवणूक वाढेल आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठी भर पडेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याजावर राज्य सरकारचा ५८ टक्के खर्च होतो. भविष्यात हा खर्च वाढत जाणार असल्यानं उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करावेच लागणार असल्याचं ते म्हणाले. राज्याची अर्थव्यवस्था चिंताजनक परिस्थितीत आहे अशी बदनामी काही लोक करत आहेत. हे प्रकार टाळा असं आवाहन त्यांनी विरोधकांना केलं.

महिलांसाठीच्या पिंक ई- रिक्षा योजनेचा विस्तार करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. शेतकऱ्यांना साडे ८ लाख कृषी पंप, त्यासाठी ९० टक्केपर्यंत अनुदान. जोतिबा मंदिर आणि परिसराच्या विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरण, त्र्यंबकेश्वर मधल्या निवृत्तीनाथ महाराजांच्या समाधी स्थळाचा विकास, सातारा जिल्ह्यात शहीद तुकाराम ओंबळे यांच्या स्मारकासाठी अनुदान अशा विविध घोषणा त्यांनी यावेळी केल्या. यावेळी अर्थसंकल्पावरच्या चर्चेत ७० सदस्यांनी भाग घेतला.

**<><><><><>**

विधानपरिषदेत अर्थसंकल्पावरची चर्चा आज सुरु झाली. राज्याच्या तिजोरीत खडखडाट असताना निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केवळ स्वतःचा अजेंडा राबवण्यासाठी सरकारनं अर्थसंकल्पाचा वापर केला आहे अशी टीका

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. राज्याची आर्थिक स्थिती ,उत्पन्न आणि तूट यांचा ताळमेळ न राखता या अर्थसंकल्पात केवळ घोषणांच केल्या आहेत, मात्र प्रत्यक्षात त्याचा जनतेला लाभ होणार नाही, असं ते म्हणाले.

राज्यावर कर्जाचा डोंगर असून कृषी आणि उद्योग क्षेत्राकडे सरकारचं पूर्णपणे दुर्लक्ष झालं आहे, असं सांगून ते म्हणाले, जनतेशी संबंधित असलेल्या सर्व विभागांना सर्वात कमी तरतूद या अर्थसंकल्पात आहे. गेल्या अर्थसंकल्पातल्या योजनांची अंमलबजावणी झालेली नाही, असं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

स्पर्धा परीक्षेत गैरव्यवहार रोखण्यासाठीचं महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध विधेयक आज विधानसभेत मांडण्यात आलं. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेतली जाणारी शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी (TAIT) आणि शिक्षक पात्रता चाचणी (TET), यासह शासनाच्या विविध विभाग आणि प्राधिकरणाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या बाबत या कायद्यातील तरतुदी लागू असतील. यात अयोग्य मार्गांचा वापर करणाऱ्यांना ३ ते ५ वर्ष शिक्षा आणि १० लाख रुपये दंड करण्याची तरतूद आहे. परीक्षा घेण्याची जबाबदारी असलेल्या संस्थेवर एक कोटी रुपये पर्यंत दंड आणि परीक्षेचा खर्च वसूल केला जाणार आहे. याशिवाय त्यांना ४ वर्ष कोणतीही स्पर्धा परीक्षा आयोजित करण्याची जबाबदारी दिली जाणार नाही. सेवा पुरवणाऱ्या संस्थेचे कर्मचारी यात दोषी आढळले तर त्यांनाही ३ ते १० वर्ष तुरुंगवास आणि १ कोटी रुपये दंड आकारला जाणार आहे. पेपर फुटीच्या प्रकरणांची
चौकशी पोलिस उप अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत केली जाणार आहे.

**<><><><><>**

महागाई सातत्याने वाढत असून त्याकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीनं आज विधानभवन परिसरात निदर्शनं केली.

विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली आमदारांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणा दिल्या.

**<><><><><>**

टी २० विश्वचषक विजेत्या भारतीय संघातल्या मुंबईकर क्रिकेटपटूंचा आज विधान भवनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. विश्वचषक विजेत्या भारतीय संघाला राज्य सरकारनं ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमात केली. आजच्या सत्कारमूर्तींमध्ये संघाचा कर्णधार रोहित शर्मा तसंच सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जयस्वाल या खेळाडूंचा समावेश होता. गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांब्रे आणि संघ व्यवस्थापक अरुण कानडे यांचाही सत्कार मुख्यमंत्र्यांनी केला. देशाला संपूर्ण संघाचा अभिमान असून सर्वोत्तम क्रिकेटपटू घडवण्यासाठी मुंबईत अकादमी सुरू करायला राज्य सरकार पूर्ण सहकार्य करेल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात विश्वविजेत्या भारतीय संघाचं नाव नोंदवलं जाईल असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. मुंबईत कालच्या गर्दीचं योग्य नियोजन करणाऱ्या पोलिसांचे आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे त्यांनी आभार मानले. मुंबई वानखेडे पेक्षा मोठं मैदान उभ करावं अशी मागणी त्यांनी बीसीसीआय चे खजिनदार आशिष शेलार यांच्याकडे केली.

रोहितनं टी २० मधून निवृत्ती स्वीकारली असली तरी भविष्यात टी २० सामने पाहताना त्याची आठवण येत राहील, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

विविध सामन्यात विविध खेळाडूंनी चांगली कामगिरी केल्यानं हा विजय साकार झाला असल्याचं कर्णधार रोहित शर्मा यानं यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठीच्या नीट - पी जी प्रवेश परीक्षेचं सुधारित वेळापत्रक राष्ट्रीय परीक्षा महामंडळानं आज जाहीर केलं. त्यानुसार नीट - पी जी प्रवेश परीक्षा २०२४ ही आता ११ ऑगस्ट या दिवशी दोन सत्रात घेतली जाणार आहे. ही परीक्षा गेल्या महिन्यात, परीक्षेच्या आदल्या दिवशी पुढे ढकलण्यात आली होती.

**<><><><>**

महिला क्रिकेटमधे, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-२० मालिकेतला पहिला सामना आज होत आहे. चेन्नईतल्या चिदंबरम स्टेडिअमवर संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरु झाला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाला या भारतदौऱ्यात आतापर्यंत यश मिळवता आलेलं नाही. एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारतानं त्यांना ३-० नं पराभूत केलं होतं, तर दोन्ही संघांमधे झालेल्या एकमेव कसोटी सामन्यात भारतानं १० गडी राखून त्यांच्यावर विजय मिळवला होता.

**<><><><>**

कर्तव्यावर असताना अतुलनीय कामगिरी केलेल्या लष्करातल्या वीरांना तसंच शहीदांच्या कुटुंबियांना शौर्य  पदकांचं वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज झालं.  दिल्लीत राष्ट्रपती भवनात आज लष्करी अधिकारी  शौर्य पदक वितरण सोहळा - 2024  आयोजित केला होता. या सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी,  संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहूल गांधी  आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><>**

नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानात, आज गडचिरोली जिल्ह्यात अहेरी, सिरोंचा आणि भामरागड या ३ तालुक्यांमधे या अभियानाचं उद्घाटन जिल्हा

परिषदेत झालं याप्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, कृषी कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, बचत गटाच्या कार्यकर्त्या आदींना सन्मानित करण्यात आलं. शिवाय शेतकऱ्यांना बियाणे कीट आणि विद्यार्थ्यांना पुस्तके आणि टॅब वितरीत करण्यात आले. येत्या ३० सप्टेंबरपर्यंत देशातल्या ५०० तालुक्यात हे अभियान राबवलं जाणार आहे.

<><><><><>

आषाढी एकादशी निमित्त नाशिकच्या सायकलिस्ट फाऊंडेशननं आयोजित केलेल्या  सायकल वारीचा आज प्रारंभ झाला. या सायकल वारीत ३०० सायकलस्वार सहभागी झाले असून त्यात ४० महिलांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या वारीत एका पायानं सायकल चालवणारा एक दिव्यांग वारकरी देखील सहभागी झाला आहे.

<><><><><>

विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी मतदान होणार हे आज स्पष्ट झालं. अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी कुणीही अर्ज मागे न घेतल्यानं ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात आहेत. आता १२ जुलै रोजी मतदान होऊन त्याचदिवशी सायंकाळी मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, कोकणात काही ठिकाणी मुसळधार तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रातही तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात, कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडयात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेध शाळेनं व्यक्त केली आहे.  या काळात कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//